मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# रावेतमध्ये जगतापांचा 'फास्ट ट्रॅक'! 715 तक्रारींवर तत्काळ कारवाई'!

## 'आमदार आपल्या दारी'ला उत्स्फूर्त प्रतिसाद; अतिक्रमण, रस्ते, पाणी प्रश्नांवर कडक निर्देश

» पिंपरी | प्रतिनिधी

**नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यांचे जलदगतीने निराकरण करण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून रावेत येथील समीर लॉन्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार आपल्या दारी' उपक्रमाला रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या जनसंवाद कार्यक्रमात आमदार जगताप यांनी तब्बल ७१५ नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि तत्काळ सोडवता येणाऱ्या प्रश्नांवर जागेवरच कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तांत्रिक किंवा प्रशासकीय प्रक्रिया आवश्यक असलेल्या प्रकरणांचा कालबद्ध पाठपुरावा करण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.**




या उपक्रमात नागरिकांनी पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, वीजपुरवठा, वाहतूक, अतिक्रमण, कचरा व्यवस्थापन, रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित समस्या आमदार शंकर जगताप यांच्यासमोर मांडल्या. नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेताना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी जागेवरच चर्चा करून प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. आमदार जगताप यांनी अतिक्रमणमुक्त रावेतचा निर्धार व्यक्त करत पादचाऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या फुटपाथवरील अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे खाजगी तसेच महापालिकेच्या जागेवरील आठवडे बाजार यांच्यावरही कडक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. रस्त्यांच्या दुतर्फा बेकायदेशीरपणे उभ्या राहणाऱ्या जड वाहनांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका निर्माण होत असल्याने अशा वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी सोसायटीधारकांनी केली.

विकासनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा व सांस्कृतिक केंद्र उभारण्याची मागणी करण्यात आली. किवळे परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र उद्यान विकसित करावे, सेवा रस्त्यांचे डांबरीकरण करावे, खराब किंवा बंद असलेले स्ट्रीट लाईट सुरू करावेत, डीपीमधील प्रलंबित रस्त्यांची कामे मार्गी लावावीत, अशा मागण्या नागरिकांनी केल्या. परिसरातील भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव, नियमित कचरा संकलन न होणे, घंटागाडी वेळेत न येणे तसेच कचरा संकलन केंद्राबाबतही नागरिकांनी तक्रारी मांडल्या. पाणीपुरवठा नियमित आणि वेळेत व्हावा, महावितरणचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, यासह विविध मूलभूत सुविधांबाबत नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

'आमदार आपल्या दारी' या उपक्रमामुळे नागरिकांना विविध महापालिका आणि शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याऐवजी एकाच ठिकाणी आपल्या समस्या थेट संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडता आल्या. नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन ती संबंधित विभागाकडे सोपविण्यात आली. आरोग्य, पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान, कर संकलन, नगररचना, बांधकाम परवानगी, विद्युत आणि पर्यावरण विभागांची स्वतंत्र दालने उभारण्यात आली होती. तसेच तहसील विभाग, रेशनकार्ड, तलाठी, एमएनजीएल, एमएसईबी आणि एनएचएआय विभागाचे अधिकारीही नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उपस्थित होते. त्यामुळे अनेक प्रश्नांवर नागरिकांना थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधता आला. तातडीने सोडविता येणाऱ्या तक्रारींवर जागेवरच कार्यवाही करण्यास सांगण्यात आले, तर मोठ्या स्वरूपाच्या आणि प्रशासकीय प्रक्रियेची आवश्यकता असलेल्या प्रश्नांचा कालबद्ध पद्धतीने पाठपुरावा करण्याचे निर्देश आमदार जगताप यांनी दिले.

> "नागरिकांनी आपल्या प्रश्नांसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवू नयेत, यासाठी थेट नागरिकांपर्यंत जाण्याचा माझा हा प्रयत्न आहे. आज याच माध्यमातून रावेत, किवळे आणि मामुर्डीकरांच्या समस्या जाणून घेतल्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे राज्य विकासाच्या मार्गावर वेगाने प्रगती करत आहे. आमदार आपल्या दारी या उपक्रमातून स्थानिक पातळीवरील प्रश्नांसोबतच शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या विषयांवरही संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून ठोस आणि कालबद्ध कार्यवाही केली जाईल. नागरिकांचा प्रत्येक प्रश्न हा माझ्यासाठी प्राधान्याचा विषय असून, त्याचा निरंतर पाठपुरावा केला जाईल."
>
> -शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

# मोशी कचरा डेपोला 'ब्रेक'; महिनाअखेरीस वेस्ट टू एनर्जी प्रकल्प पुन्हा सुरू!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशी कचरा डेपोतील बंद असलेला वेस्ट टू एनर्जी प्रकल्प महिनाअखेरीस पुन्हा सुरू होणार असून, दररोज सुमारे १ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. चिमणी दुरुस्तीचे काम सुरू असून, बायोमायनिंगची कामेही अंतिम टप्प्यात आहेत. शहरात यापुढे कचरा डंपिंगची जागा ठेवली जाणार नसल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.**



शहरातील कचरा प्रक्रिया व्यवस्थेला गती देण्यासाठी एकूण १२ जागा प्रस्तावित करण्यात आल्या असून, त्यापैकी सहा ठिकाणी सुका कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याची तयारी सुरू आहे. बायो-सीएनजी प्रकल्पासाठी आवश्यक मोठी जागा उपलब्ध नसल्याने छोट्या जागेत प्रकल्प उभारण्याचा पर्यायही प्रशासनाकडून तपासला जात आहे. तसेच वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठीही पर्यायी जागांचा शोध सुरू आहे. दरम्यान, शहरातील कचरा संकलन व्यवस्था सुरळीत करण्यासाठी ठेकेदारांवर कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. कचरा उचलण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, खराब कचरा संकलन गाड्या तातडीने दुरुस्त करण्यासह मनुष्यबळ आणि वाहनांची संख्या वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नवीन निविदा काढताना यापूर्वीच्या त्रुटी दूर करून अधिक प्रभावी व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

# मोशीतील साईड पट्टे की अपघाताचा सापळा?

## मुरूमाऐवजी दगड-गोटे; अर्धवट कामामुळे वाहनचालक, पादचारी धोक्यात!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईड पट्ट्यांची झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या कामाच्या पद्धतीवर नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. साईड पट्ट्यांवर लहान मुरूम टाकून योग्य पद्धतीने मजबुतीकरण करण्याऐवजी मोठे दगड व गोटे टाकण्यात येत असल्याने समस्या दूर होण्याऐवजी पादचारी आणि वाहनचालकांसाठी नवीन धोका निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**



गेल्या काही दिवसांपासून महामार्गाच्या कडेला साईड पट्ट्यांचे काम सुरू आहे. मात्र, या ठिकाणी टाकण्यात आलेले मोठे दगड, गोटे मिश्रित मुरूम व्यवस्थित समतल न केल्याने दुचाकीस्वारांना वाहन रस्त्याच्या कडेला नेताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच एखादे वाहन अचानक बाजूला घेतल्यास दगडांवरून दुचाकी घसरण्याची किंवा वाहनावरील नियंत्रण सुटण्याची शक्यता आहे.

या महामार्गावर मोठ्या प्रमाणात पादचारी, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच स्थानिक नागरिकांची ये-जा असते. मात्र, साईड पट्ट्यांवर मोठे दगड व गोटे पसरलेले असल्याने पादचाऱ्यांना महामार्गाच्या मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे भरधाव वाहनांच्या गर्दीतून वाट काढताना अपघाताचा धोका वाढला आहे.

विशेषतः सकाळी व सायंकाळच्या वेळेत या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. अशा परिस्थितीत पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी योग्य साईड पट्टा उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र, सध्याच्या कामामुळे सुरक्षित मार्ग मिळण्याऐवजी नागरिकांच्या अडचणी वाढल्याचे चित्र आहे.

### महामार्ग प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी!

साईड पट्ट्यांचे काम तातडीने थांबवावे, असे नागरिकांचे म्हणणे नसून ते योग्य पद्धतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी मागणी आहे. दगड-गोटे हटवून त्याठिकाणी योग्य आकाराचा मुरूम टाकावा, साईड पट्टे समतल करावेत आणि आवश्यकतेनुसार रोलिंग करून ते वाहनचालक व पादचाऱ्यांसाठी सुरक्षित करावेत, अशी मागणी होत आहे.

साईड पट्ट्यांची दुरवस्था दूर करण्यासाठी काम हाती घेण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र, प्रत्यक्षात कामाची गुणवत्ता आणि पद्धत पाहता 'रोग बरा, पण उपचार नको' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची टीका होत आहे. ज्या ठिकाणी साईड पट्ट्यांची उंची खोल आहे अशा सर्व ठिकाणी मुरुम टाकणे आवश्यक असताना केवळ काहीच ठिकाणी दगड,गोटे टाकले आहेत म्हणजेच काम अर्धवट केले जात आहे आणि सद्यस्थितीत तर ते कामही बंद असून अनेक ठिकाणी याचे मोठे ढिग जसेच्या तसेच आहेत .

साईड पट्टे मजबूत करण्यासाठी योग्य दर्जाचा लहान मुरूम टाकून त्याचे व्यवस्थित सपाटीकरण व रोलिंग करणे अपेक्षित असताना केवळ मोठे दगड-गोटे टाकून काम उरकण्याचा प्रयत्न होत असल्यास त्याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

> "महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी आणि निकृष्ट काम आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी.महामार्गावरील साईड पट्टे हे केवळ रस्त्याच्या सौंदर्यासाठी नसून वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा महत्त्वाचा भाग आहेत.योग्य पद्धतीनेच साईड पट्ट्यांचे मजबुतीकरण करावे,त्यामुळे अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे."
>
> -संतोष बोराटे, स्थानिक नागरीक

# पिंपरी-चिंचवडमध्ये स्वाईन फ्लूचा उद्रेक! ऑगस्टमध्ये तब्बल ३१ रुग्ण!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात स्वाईन फ्लूने पुन्हा डोके वर काढल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत शहरात एकूण ३७ रुग्णांना स्वाईन फ्लूची लागण झाल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे. विशेष म्हणजे ऑगस्ट महिन्यातच तब्बल ३१ रुग्ण आढळल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**




महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी महिन्यात स्वाईन फ्लूचा एक रुग्ण आढळला होता. त्यानंतर काही काळ रुग्णसंख्या नियंत्रणात होती. मात्र, जुलै महिन्यात पाच रुग्णांची नोंद झाल्यानंतर ऑगस्टमध्ये परिस्थितीत अचानक वाढ झाली आणि तब्बल ३१ रुग्ण आढळून आले. त्यामुळे जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या कालावधीत शहरातील स्वाईन फ्लू बाधित रुग्णांची संख्या ३७ वर पोहोचली आहे. सुदैवाने आतापर्यंत आढळलेल्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून, कोणत्याही रुग्णाची स्थिती गंभीर झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीचा विचार केला असता, २०२२ मध्ये शहरात स्वाईन फ्लूचे सर्वाधिक ५८ रुग्ण आढळून आले होते. त्याच वर्षी ऑगस्ट महिन्यात तब्बल ३४ रुग्णांची नोंद झाली होती. त्यानंतर २०२४ मध्ये १५ रुग्ण आढळले होते. यंदा ऑगस्ट महिन्यातच ३१ रुग्ण आढळल्याने आरोग्य विभागाची चिंता वाढली असून, नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः गणेशोत्सवाच्या काळात शहरात विविध मंडळांचे कार्यक्रम, मिरवणुका आणि धार्मिक स्थळांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने संसर्गाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करावा, हात वारंवार साबणाने स्वच्छ धुवावेत आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेची काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

सर्दी, खोकला, घसा खवखवणे, अंगदुखी किंवा ताप यांसारखी लक्षणे जाणवत असल्यास नागरिकांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये. स्वतःहून औषधे घेण्याऐवजी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि आवश्यक असल्यास तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर आजार असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले की, स्वाईन फ्लूच्या रुग्णसंख्येत वाढ झाली असली तरी सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नाही; मात्र लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेत वैद्यकीय उपचार घेणे महत्त्वाचे आहे. ताप, सर्दी, खोकला किंवा श्वसनाशी संबंधित त्रास जाणवल्यास नागरिकांनी तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात किंवा आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील सर्व रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. संशयित रुग्णांची तपासणी, बाधित रुग्णांवर उपचार आणि आजाराच्या प्रसारावर लक्ष ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. गर्दीच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यासह नागरिकांमध्ये स्वाईन फ्लूबाबत जनजागृती करण्यावरही भर दिला जात आहे. त्यामुळे गणेशोत्सवाचा उत्साह कायम ठेवताना नागरिकांनी आरोग्याची काळजी घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुण्याच्या वाहतूक कोंडीला ‘ब्रेक’! एचसीएमटीआरच्या डीपीआरला वेग!

## १० हजार कोटींचा प्रकल्प; तीन महिन्यांत डीपीआर, चार टप्प्यांत उभारणी!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रस्तावित असलेल्या बहुचर्चित उच्च क्षमता अंतर्गत वर्तुळाकार मार्ग (एचसीएमटीआर) प्रकल्पाला आता वेग मिळणार आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली असून, पुढील तीन महिन्यांत डीपीआर तयार करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.**



शहरातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एचसीएमटीआर प्रकल्पासाठी आग्रही असून, प्रकल्पाला गती देण्यासाठी पुणे तसेच मुंबई येथे वरिष्ठ पातळीवर बैठका सुरू आहेत. राज्य शासन आणि महापालिका यांच्यातील समन्वयातून आवश्यक परवानग्या आणि प्रशासकीय अडथळे दूर करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे अनेक वर्षे रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाला आता प्रत्यक्ष दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महापालिकेने १९८६ मध्ये शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून सुमारे ३६ किलोमीटर लांबीचा एचसीएमटीआर उन्नत वर्तुळाकार मार्ग प्रस्तावित केला होता. मात्र, विविध कारणांमुळे हा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडला. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, प्रमुख रस्त्यांवर सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर एचसीएमटीआर प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्याला महापालिकेने प्राधान्य दिले आहे.

संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे १० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये खासगी जागांच्या भूसंपादनासाठी सुमारे १ हजार ३०० कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी चार टप्प्यांत करण्यात येणार असून, डीपीआर तयार करताना प्रत्येक टप्प्याचा स्वतंत्रपणे विचार केला जाणार आहे. संपूर्ण एचसीएमटीआरचा एकत्रित डीपीआर तयार केला जाणार असला, तरी प्रत्यक्ष कामाच्या दृष्टीने प्रत्येक पॅकेज स्वतंत्रपणे तयार करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, एचसीएमटीआरच्या जुन्या आराखड्यात तब्बल १२ ठिकाणी बदल करण्यात आले आहेत. झोपडपट्टी, नदीपात्र आणि मोठ्या प्रमाणात गर्दी असलेल्या भागातून जाणारे काही प्रस्तावित मार्ग बदलण्यात आले आहेत. त्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन, पुनर्वसन आणि इतर अडचणी तुलनेने कमी होण्याची शक्यता आहे. नव्या आराखड्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी अधिक व्यवहार्य आणि वेगाने करता येईल, असा प्रशासनाचा दावा आहे.

मात्र, वडगावशेरी परिसरातील सुमारे १४७ घरांवर या प्रकल्पाचा परिणाम होणार आहे. संबंधित नागरिकांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या मार्गातील बाधित नागरिकांचे पुनर्वसन आणि भूसंपादनाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान महापालिकेसमोर राहणार आहे.

एचसीएमटीआर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल, तसेच शहरातील विविध भागांना जोडणारा पर्यायी जलद मार्ग उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पुणेकरांचे लक्ष आता तीन महिन्यांत तयार होणाऱ्या डीपीआरकडे लागले असून, कागदावर वर्षानुवर्षे असलेला हा प्रकल्प प्रत्यक्षात कधी उतरतो, याकडे शहरवासीयांचे लक्ष आहे.

### भूसंपादनाचा अडथळाही कमी होणार!

एचसीएमटीआरचा मोठा भाग राज्य शासन आणि महापालिकेच्या मालकीच्या जागांमधून जाणार असल्याने भूसंपादनासाठी फार मोठा कालावधी लागणार नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. हा मार्ग उन्नत स्वरूपाचा असल्याने राज्य सरकारच्या मालकीच्या जागांमधून मार्ग जात असलेल्या ठिकाणी आवश्यक परवानगी घेऊन काम पुढे नेता येणार आहे. प्रकल्पाला प्रशासकीय अडथळे निर्माण होऊ नयेत यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या आहेत.

# बापटांना मारहाण करणाऱ्याची खैर नाही! पोलीस आयुक्तांचा कडक इशारा!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**डीजेविरोधात भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांना टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात मारहाण करण्यात आल्याने पुण्यात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत मारहाण करणाऱ्या युवकाला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडे चौकशी सुरू आहे. या प्रकरणात संबंधितावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी स्पष्ट केले.**



दहीहंडी आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दलाच्या वतीने गणेश कला क्रीडा मंच येथे उत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. शहरातील उत्सव शांततेत आणि कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत पार पडावेत, यासाठी पोलिसांकडून कार्यकर्त्यांना विविध सूचना देण्यात आल्या. याच बैठकीदरम्यान पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी विद्यानंद बापट यांच्यावरील मारहाणीच्या घटनेचा उल्लेख करत संबंधित प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

“विद्यानंद बापट यांना केलेली मारहाण निंदनीय आहे. अशा कृतीमुळे उत्सवाच्या काळात वातावरण दूषित होते,” असे अमितेशकुमार यांनी स्पष्ट केले. एखाद्या व्यक्तीची भूमिका किंवा मत आपल्याला मान्य नसले, तरी त्याला विरोध करण्यासाठी मारहाण करणे किंवा कायदा हातात घेणे योग्य नाही. देशातील प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मतभेद असले तरी ते कायदेशीर आणि लोकशाही मार्गानेच मांडले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

या प्रकरणात मारहाण करणाऱ्या युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घटनेमागील कारणे आणि संपूर्ण पार्श्वभूमी तपासली जात आहे. बापट यांच्याशी नेमका कोणत्या कारणावरून वाद झाला, मारहाणीमागे आणखी कोणी सहभागी होते का, तसेच या घटनेचे स्वरूप काय होते, याबाबत पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. तपासातून दोष सिद्ध झाल्यास संबंधितावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले. गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या काळात पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिक रस्त्यावर येतात. विविध मंडळांकडून कार्यक्रम, मिरवणुका आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या काळात शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

कोणत्याही व्यक्तीच्या वक्तव्यावरून किंवा भूमिकेवरून वाद निर्माण होऊन त्याचे रूपांतर हाणामारीत होऊ नये, यासाठी सर्वांनी संयम बाळगावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

“मतभेद असतील तर ते चर्चेतून सोडवा; मारहाण करून कायदा हातात घेऊ नका,” असा स्पष्ट संदेश अमितेशकुमार यांनी कार्यकर्त्यांना दिला. त्यामुळे बापट यांच्यावरील मारहाणीच्या प्रकरणात पोलिसांची पुढील कारवाई काय होते, याकडे आता लक्ष लागले आहे.

### मत मांडण्याचा अधिकार; कायदा हातात घेऊ नका!

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी उत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना स्पष्ट शब्दांत आवाहन केले की, प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. मात्र, मत मांडताना कोणी कायद्याची लक्ष्मणरेषा ओलांडली तर त्याच्यावर पोलिसांकडून कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे एखाद्याचे मत किंवा भूमिका पटली नाही म्हणून त्याच्यावर हल्ला करण्याचा अथवा कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही.

# चांदणी चौक उड्डाणपुलाला पुन्हा ‘ब्रेक’!

## आयुक्त नवल किशोर राम यांचा मोठा निर्णय; आधीची निविदा रद्द!

**पुणे | प्रतिनिधी**

**चांदणी चौक ते भूगाव या ६० मीटर रुंदीच्या रस्त्यासह प्रस्तावित उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटरच्या कामाला पुन्हा एकदा विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकल्पासाठी महापालिकेने काढलेल्या निविदेवर काँग्रेसकडून गंभीर आक्षेप नोंदविण्यात आल्यानंतर महापालिका प्रशासनाने ही निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आधीची निविदा रद्द करून फेरनिविदा काढण्याचे आदेश दिले आहेत.**



चांदणी चौक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, निविदेतील खर्चावरून आता वाद निर्माण झाला आहे. महापालिकेच्या अंदाज समितीने डिसेंबर २०२५ मध्ये प्रकल्पासाठी अपेक्षित खर्च निश्चित केला होता. त्यापेक्षा तब्बल ४५ कोटी रुपये अधिक रक्कम निविदेत दाखविण्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी केला होता.

निविदेतील या कथित वाढीमुळे महापालिकेच्या आर्थिक व्यवहारावर आणि संपूर्ण निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. हे काम ठराविक ठेकेदाराला मिळावे, यासाठी महापालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही शिंदे यांनी केला होता. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती.

दरम्यान, महापालिकेच्या प्रकल्प विभागाने ४५ कोटी रुपयांची वाढ झाल्याचा आरोप फेटाळला आहे. प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांच्या म्हणण्यानुसार, महापालिकेने अपेक्षित धरलेल्या खर्चाच्या तुलनेत निविदेतील खर्चात प्रत्यक्षात केवळ सुमारे दीड कोटी रुपयांची वाढ झाली आहे. डिसेंबर २०२५ नंतर काही बांधकाम साहित्याच्या दरांमध्ये वाढ झाली. तसेच मंजूर नकाशा आणि प्रत्यक्ष कामाच्या गरजेनुसार काही बदल करणे आवश्यक झाल्याने खर्चात वाढ झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेण्यात आल्याने प्रशासनाने ही प्रक्रिया पुढे न नेता ती रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आयुक्तांच्या आदेशानुसार आता या कामासाठी फेरनिविदा काढली जाणार आहे. पुढील काही दिवसांत नव्याने निविदा प्रक्रिया सुरू होणार असल्याचे गोजारे यांनी सांगितले.

या निर्णयामुळे चांदणी चौकातील महत्त्वाकांक्षी उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामाला काहीसा विलंब होण्याची शक्यता आहे. एकीकडे चांदणी चौक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या प्रकल्पाची गरज व्यक्त होत असताना दुसरीकडे निविदेवरील आरोप-प्रत्यारोपांमुळे प्रक्रिया पुन्हा नव्याने सुरू करावी लागणार आहे. त्यामुळे फेरनिविदा किती लवकर काढली जाते आणि त्यानंतर प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होते, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

### निविदा रद्द; आता पुन्हा प्रक्रिया!

चांदणी चौक ते भूगाव उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटरच्या कामासाठी काढण्यात आलेली आधीची निविदा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी रद्द केली आहे. निविदेतील खर्चावरून काँग्रेसने आक्षेप घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. आता पुढील काही दिवसांत फेरनिविदा काढली जाणार असून, त्यामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यास आणखी विलंब होण्याची शक्यता आहे.

# ‘डीजेमुक्ती’साठी रविवारी महापालिकेवर धडकणार मोर्चा!

**पुणे | प्रतिनिधी**

**सार्वजनिक ठिकाणी डीजे आणि लाऊडस्पीकरच्या मोठ्या आवाजाला विरोध करणारे विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर पुण्यात आता ‘डीजेमुक्ती’ची मागणी जोर धरू लागली आहे. बापट यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ आणि त्यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी रविवारी पुणे महापालिकेवर मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यामुळे या आंदोलनाकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.**




विद्यानंद बापट गेल्या काही दिवसांपासून सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात वाजविण्यात येणाऱ्या डीजे आणि लाऊडस्पीकरविरोधात भूमिका मांडत आहेत. गुरुवारी टिळक रोड परिसरात एका वृत्तवाहिनीशी चर्चा करत असताना संतोष चव्हाण याने बापट यांच्यावर हल्ला केला. चव्हाण याने त्यांच्या तोंडावर फटका मारल्यानंतर परिसरात काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. उपस्थित पत्रकार आणि नागरिकांनी बापट यांना बाजूला नेले, तर काहींनी हल्लेखोराला रोखण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला.

या हल्ल्यामुळे बापट यांच्या डीजेविरोधी भूमिकेला आता नागरिकांकडून पाठिंबा मिळताना दिसत आहे. हल्ल्याचा निषेध करण्यासोबतच सार्वजनिक ठिकाणी ध्वनिप्रदूषण करणाऱ्या डीजे आणि लाऊडस्पीकरच्या वापराबाबत कठोर भूमिका घेण्याची मागणी करण्यात येत आहे.

हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल सावंत यांनी व्हिडीओ प्रसिद्ध करून रविवारी होणाऱ्या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रविवारी सकाळी ११ वाजता बालगंधर्व चौकातील झाशीची राणी पुतळ्याजवळ नागरिकांनी एकत्र यावे आणि तेथून पुणे महापालिकेवर मोर्चा काढण्यात यावा, असे आवाहन सावंत यांनी केले आहे.

या आंदोलनाच्या माध्यमातून डीजे आणि लाऊडस्पीकरच्या वाढत्या आवाजाविरोधात प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विशेषतः गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

डॉ. राहुल सावंत यांनी विद्यानंद बापट यांच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. “बापट यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत आणि त्यांना पूर्ण पाठिंबा असेल,” अशी भूमिका सावंत यांनी मांडली. त्यामुळे बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध आणि डीजेविरोधी आंदोलन यांना एकाच वेळी व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बापट यांच्यावर हल्ला केल्याप्रकरणी पुणे गुन्हे शाखेने संतोष चव्हाण याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. हल्ल्याच्या घटनेनंतर कायदा हातात घेण्याचा प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, अशी भूमिका पोलिस आणि प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांकडूनही निषेध!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे आणि मतभेद असले तरी मारहाण करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पुण्यासारख्या शहरात अशा प्रकारचे वाद टाळले पाहिजेत, तसेच गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याच्या दिशेने पावले उचलली पाहिजेत, असेही फडणवीस यांनी म्हटले.